## मंत्री उदय सामंत यांनी घेतला शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षेचा आढावा

# परीक्षांमध्ये तांत्रिक अडचण येणार नाही

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

अंतिम वर्षाच्या परीक्षांमध्ये कोणतीही तांत्रिक



अडचण येणार नाही, याची खबरदारी घेऊन विद्यापीठाच्या परीक्षा सुरळीत पार पडल्या जातील, अशी ग्वाही उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी पत्रकार परिषदेत दिली. त्यांनी शिवाजी विद्यापीठात येऊन अंतिम वर्षाच्या परीक्षांबाबतचा प्रशासनाकडून आढावा घेतला. त्यानंतर पत्रकार परिषद घेत अधिक माहिती दिली.

उदय सामंत म्हणाले, जे विद्यार्थी ऑनलाईन परीक्षा देणार आहेत, त्यांना कोणतीही तांत्रिक अडचण येणार नाही याबाबत खबरदारी घेऊनच परीक्षा घेतल्या जातील. ▶▶ पान २ वर

## अंतिम वर्ष परीक्षा १७ पासून

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा शनिवार, दि. १७ ते ३१ ऑक्टोबर या कालावधीमध्ये घेतल्या जाणार आहेत. तीन सत्रांत परीक्षा घेण्याची तयारी विद्यापीठाने सुरू केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याचे नियोजन राज्य सरकार व विद्यापीठ प्रशासनाने सुरू केले आहे.

३१ ऑक्टोबरपर्यंत परीक्षा घेऊन १० नोव्हेंबरपूर्वी निकाल लावण्याच्या सूचना विद्यापीठांना दिल्या आहेत. तीन सत्रांत अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यात येणार आहेत. ३१ ऑक्टोबरपूर्वी परीक्षा पूर्ण करणार असल्याने एका दिवसात ▶▶ पान २ वर

# सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक संकुल

## १ जानेवारीपासून होणार कार्यान्वित : उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांची माहिती

प्रतिनिधी

कोल्हापूर

सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी १ जानेवारीपासून शैक्षणिक संकुल सुरु करण्यात येणार आहे. या संकुलासाठी शिनोळी (ता. चंदगड) येथे तात्पुरत्या स्वरुपात भाडे तत्वावर जागा निश्चित केली आहे. १ जानेवारीपासून या संकुलामध्ये अभ्यासक्रम सुरु केले जातील अशी माहिती शुक्रवारी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मंत्री उदय सामंत शुक्रवारी जिल्हा



दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी शिवाजी विद्यापीठामध्ये पत्रकारांशी संवाद साधला. पत्रकार परिषदेला कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर उपस्थित होते.

मंत्री सामंत म्हणाले, सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी भव्य शैक्षणिक संकुल उभा करण्यात

### मुंबई, सोलापूरप्रमाणे तांत्रिक अडचणी नकोत

मुंबई, सोलापूर, गोंडवणा विद्यापीठाच्या ऑनलाईन परीक्षांमध्ये अडचणी निर्माण झाल्या आहेत. अशा प्रकारच्या त्रुटी शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा घेताना येऊ नयेत यासाठी सर्व खबरदारी घेण्याच्या सूचना केल्या आहेत. मुंबई विद्यापीठाच्या ऑनलाईन परीक्षांसाठी ९ हजार विद्यार्थी असताना ५ लाख जणांनी परीक्षेची वेबसाईट ओपन केली. हा सायबर हल्ला असून चेन्नई येथील संबंधित कंपनीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

येणार आहे. यासाठी तुडये (ता. चंदगड) येथे १० एकर जागेची निश्चिती केली आहे. मात्र १ जानेवारीपासून शिनोळी (ता. चंदगड) येथे नवीन शैक्षणिक संकुलाची उभारणी करण्यात येणार आहे. एका खासगी संस्थेची जागा भाडे तत्वावर घेण्यात येणार असून परिसरातील महाविद्यालय, महाराष्ट्र एकीकरण समिती यासह विविध संघटनांसोबत चर्चा होणार आहे.

पान ७ पहा

# अंतिम वर्ष ऑफलाईन परीक्षेबाबत आपत्ती व्यवस्थापनाची तत्काळ बैठक घ्या

## मंत्री उदय सामंत यांचे विद्यापीठासह जिल्हा प्रशासनास निर्देश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा १७ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहेत. ऑफलाईन परीक्षा घेताना विद्यार्थ्यांना कोरोनाचा संसर्ग होऊ नये, यासाठी उपाययोजना करण्याबाबत जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाची तत्काळ बैठक घेण्यात यावी, असे निर्देश उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी जिल्हाधिकारी, विद्यापीठ प्रशासनास दिले. कार्यक्षेत्रातील प्रत्येक जिल्ह्यासाठी एक नोडल अधिकारी नेमण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

### योग्य नियोजन करा

ऑनलाईन शिकवलेले समजत नाही म्हणून कोल्हापुरात विद्यार्थिनीने आत्महत्या केली. याचा दाखला देत मंत्री उदय सामंत यांनी ऑनलाईन परीक्षेचा आढावा घेण्याचे निर्देश विद्यापीठास दिले. ऑनलाईन परीक्षा घेताना शहरासह ग्रामीण भागातील मोबाईल कनेक्टिव्हिटीचा विचार करावा लागणार आहे, त्यानुसार आवश्यक ते नियोजन करावे. कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी, अशा सूचना त्यांनी केल्या.

उच्च व तंत्र शिक्षणमंत्री सामंत यांनी शिवाजी विद्यापीठात अंतिम वर्ष परीक्षाबाबत आढावा बैठक घेतली. याप्रसंगी खा. संजय मंडलिक, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, जिल्हाधिकारी दौलत देसाई, जिल्हा पोलिस अधीक्षक शैलेश बलकवडे यांची प्रमुख उपस्थिती होती. अंतिम वर्ष परीक्षेच्या अनुषंगाने त्यांनी विद्यापीठ कार्यवाहीचा आढावा घेतला.

जिल्हा पोलिसप्रमुख बलकवडे यांनी परीक्षा सुरू होण्यापूर्वी काही दिवस अगोदर विद्यार्थ्यांना सॉफ्टवेअरमधून मॉक टेस्टचे प्रश्न दिले जावेत, अशी सूचना केली. जिल्हाधिकारी देसाई यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसंदर्भात अडचण येऊ नये, यासाठी हेल्पलाईनची संख्या वाढवावी, अशी सूचना केली.

कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी स्वागत केले. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी.आर.पळसे यांनी परीक्षा तयारीची माहिती दिली.

यावेळी वित्त व लेखा अधिकारी व्ही.टी.पाटील, विद्यापीठ आस्थापना विभागाचे उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे, शासकीय तंत्रनिकेतनचे प्राचार्य प्रशांत पट्टलवार, उच्चशिक्षण सहसंचालक कार्यालयातील डी.पी.माने आदी उपस्थित होते.

# सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक संकुल

| | | |
|---|---|---|
| • शिवाजी विद्यापीठमध्ये ५० हजार विद्यार्थी देणार ऑनलाईन परीक्षा | | |
| • एकूण वियार्थी संख्या | : | ७४ हजार १७ |
| • ऑनलाईन परिक्षा देणारे विद्यार्थी | : | ५० हजार ४१७ |
| • ऑफलाईन परीक्षा देणारे विद्यार्थी | : | १३ हजार |
| • अद्याप नोंदणी न केलेले विद्यार्थी | : | १० हजार ६०० |
| • ऑफलाईनसाठी ३ जिल्ह्यातील परिक्षा सेंटर | : | २९३ |
| • मुले : ३४ हजार ४९९ • मुली : ३९ हजार ४१९ • दिव्यांग : २०० | | |

पान १ वरुन

या शैक्षणिक संकुलातील अभ्यासक्रम निश्चित करण्यात येणार असल्याची माहिती सामंत यांनी दिली.

तसेच सामंत यांनी सांगितले की, शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या शेवटच्या सत्रासाठी १७ ऑक्टोबरपासून परीक्षा घेण्यात येणार आहेत. ३ जिल्ह्यातील २९३ सेंटरवर ऑफलाईन पद्धतीने परीक्षा होणार आहे. येत्या दोन दिवसांमध्ये विद्यार्थ्यांना सराव प्रश्न उपलब्ध होणार असून यानंतर मौखिक चाचणी घेण्यात येणार आहे. तसेच परीक्षेच्या अनुषंगाने परीक्षेपूर्वी जिल्हाधिकारी दौलत देसाई, पोलीस अधिक्षक शैलेश बलकवडे यांना आपत्ती व्यवस्थापनाची बैठक घेण्याच्या सूचना केल्या असल्याची माहिती मंत्री सामंत यांनी दिली. तसेच एटीकेटी विद्यार्थ्यांच्या परीक्षा १२० दिवसानंतर घेण्याच्या सूचना आहेत. मात्र आता त्या तत्काळ घेण्यात येणार आहेत. रखडलेल्या प्राध्यापक भरतीचा प्रश्नही मार्गी लागला असून टप्प्याटप्प्याने ही भरती करण्यात येणार असल्याची माहितीही मंत्री सामंत यांनी दिली.

**उदय सामंत : शिवाजी विद्यापीठाच्या प्रलंबित प्रश्नांबाबत १५ ऑक्टोबरला बैठक**

# सीमावर्ती विद्यार्थ्यांसाठी जानेवारीपासून अभ्यासक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी शिवाजी विद्यापीठ संचलित असणारे शैक्षणिक संकुल चंदगड तालुक्यातील शिनोळी-तुडये दरम्यान लवकरच सुरु केले जाईल. या संकुलाच्या माध्यमातून जानेवारीपासून कौशल्य विकासाला बळ देणाऱ्या रोजगाराभिमुख विविध पदविका, प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु केले जातील, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी येथे पत्रकार परिषदेत दिली. विद्यापीठाच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत दि. १५ ऑक्टोबर रोजी मुंबईत बैठक आयोजित करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

शिनोळी एमआयडीसीतील पाच एकर जागा आणि पायाभूत सुविधांची पाहणी केली आहे. त्या ठिकाणी लवकरच तात्पुरत्या स्वरुपात शैक्षणिक संकुलाचा प्रारंभ करण्यात येईल. या संकुलाला कायमस्वरुपी तुडये येथील १० एकर शासकीय जागा देण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना सूचना केली आहे. खासदार संजय मंडलिक यांच्या अन्य घटकांनी केलेल्या सूचनेनुसार सीमाभागातील महाराष्ट्र एकीकरण समितीसह अन्य संघटनांसमवेतही चर्चा करून त्यांना अभिप्रेत असणारे अभ्यासक्रम सुरु केले जातील, असे मंत्री सामंत यांनी सांगितले.

नसीर अत्तार



कोल्हापुरात शुक्रवारी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी शिवाजी विद्यापीठात आढावा बैठक घेतली. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, खा. संजय मंडलिक, जिल्हाधिकारी दौलत देसाई, जिल्हा पोलीस अधीक्षक शैलेश बलकवडे उपस्थित होते.

## दोन दिवसांत सराव प्रश्नपत्रिका

अंतिम वर्षाच्या परीक्षेसाठी शिवाजी विद्यापीठाचे ७४०११ विद्यार्थी आहेत. त्यात मुले ३४४९९, मुली ३९४१५, दिव्यांग विद्यार्थी २०२ आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील २९३ केंद्रांवर ऑफलाईन परीक्षा होईल. विद्यार्थ्यांनी दोन दिवसांत सराव प्रश्नपत्रिका देण्यात येईल. मॉक टेस्टही लवकर होईल, असे मंत्री सामंत यांनी सांगितले.

आढावा बैठकीस खासदार मंडलिक, जिल्हाधिकारी दौलत देसाई, जिल्हा पोलीस अधीक्षक शैलेश बलकवडे, कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे, आदी उपस्थित होते.

# कॅरी फॉरवर्ड केलेल्या विषयांच्या परीक्षा पुन्हा होणार नाहीत

## उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत

**जयसिंगपूर : पुढारी वृत्तसेवा**

कोव्हिडच्या संकटामुळे कॅरी फॉरवर्ड केलेल्या विषयांच्या बाबतीत राज्यातील प्रथम आणि द्वितीय वर्षांच्या विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षा द्यावी लागणार नाही, असे आश्वासन उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाला दिले. सांगली, कोल्हापूर आणि सातारा जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाने नुकत्याच लागलेल्या निकालाबाबतच्या प्रश्नासंदर्भात मंत्री सामंत यांना कोल्हापूर येथे भेटून तक्रारी मांडल्या होत्या.

यावेळी मंत्री सामंत म्हणाले की, मार्च आणि एप्रिलमध्ये कोव्हिड संकटामुळे न झालेल्या परीक्षेत मागील सत्रातील सरासरीच्या निकषानुसार काही विद्यापीठांनी विद्यार्थ्यांना अनुत्तीर्ण केल्याचे निदर्शनास आले आहे. संबंधित विद्यापीठांना याबाबत सूचना देण्यात येतील, तसेच या कॅरी फॉरवर्ड केलेल्या विषयांना गुणपत्रिकेत दिलेला अनुत्तीर्ण शेरा काढण्याच्या सूचनाही राज्यातील संबंधित विद्यापीठांना करण्यात येतील, असे आश्वासन या शिष्टमंडळाला दिले.

यावेळी शिवाजी विद्यापीठाचे रजिस्टार विलास नांदवडेकर तसेच विद्यार्थी कृती समितीचे अवधूत देशपांडे, ऋषी पाटील, योगेश नाडकर्णी, तेजश्री कांबळे, मधुरा पाटील उपस्थित होते.



कोल्हापूर : श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेला भेट देऊन शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे व सुशीलादेवी साळुंखे यांच्या समाधीचे दर्शन घेऊन पुष्पहार अर्पण करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.

# डॉ. बापूजी साळुंखेंच्या शैक्षणिक कार्याने प्रभावित कुलगुरू डॉ. शिर्के ; विवेकानंद शिक्षण संस्थेस भेट

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विवेकानंद शिक्षण संस्थेत शिक्षण घेत असताना शिक्षणमहर्षी डॉ. बापूजींच्या शैक्षणिक कार्याने आपण प्रभावित झालो. यापूर्वीच्या प्रशासकीय कामाच्या प्रदीर्घ अनुभवाने व सर्वांच्या सहकार्याने कुलगुरू होण्याचे भाग्य लाभले, असे प्रतिपादन डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून निवड झाल्यानंतर त्यांनी प्रथमतःच स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेला भेट देऊन शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे व संस्था माता सुशीलादेवी साळुंखे यांच्या समाधीचे दर्शन घेऊन पुष्पहार अर्पण केले. डॉ. डी. टी. शिर्के हे विवेकानंद कॉलेजचे माजी विद्यार्थी असून, संख्याशास्त्र विषयात त्यांनी पदवी प्राप्त केली आहे.

कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे व संस्था सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे यांनी शुभेच्छा देत त्यांचे शाल, श्रीफळ देऊन स्वागत केले. सहसचिव प्राचार्य डॉ. युवराज भोसले, विवेकानंद कॉलेजचे प्रभारी प्राचार्य डॉ. डी. बी. पाटील, प्रा. किरण पाटील, प्रा. भाऊसाहेब गोसावी, प्रा. संतोष कुंडले, रजिस्ट्रार सी. बी. दोडमणी, अधीक्षक ए. एस. पवार उपस्थित होते. संयोजन एनसीसीप्रमुख प्रा. सुनीता भोसले, प्रा. जे. आर. भरगोंडा यांनी केले.

# सीमाभागातील अभ्यासक्रम नव्या वर्षात

## उच्च व तंत्र शिक्षणमंत्री सामंत; शिनोळी, तुडयेत भाडेतत्त्वावर जागा

कोल्हापूर, ता ९ : सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात येणाऱ्या शैक्षणिक संकुलाचे अभ्यासक्रम जानेवारीमध्ये सुरू होतील. चंदगडमधील शिनोळी आणि तुडये दरम्यान खासगी कंपनीची जागा भाडेतत्त्वावर घेतली असून येथे हे अभ्यासक्रम शिकवले जातील. तुडयेलगतच दहा एकर जागेचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांनी बनवला असून याचीही कार्यवाही लवकरच होईल, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. विद्यापीठाच्या अंतिम वर्ष परीक्षा तयारीचा आढावा घेण्यासाठी मंत्री सामंत आज कोल्हापुरात आले होते.

आढावा बैठकीनंतर पत्रकार परिषदेमध्ये मंत्री सामंत म्हणाले, ''सीमाभागातील विद्यार्थ्यांना मराठी भाषेतून उच्च व व्यावसायिक शिक्षण घेता यावे, यासाठी राज्य सरकार शैक्षणिक संकुल उभारणार आहे. शैक्षणिक संकुलाचे अभ्यासक्रम जानेवारीपासून सुरू होतील. यासाठी खासगी कंपनीची जागा भाडेतत्त्वावर घेतली आहे.''

### एक दृष्टिक्षेप

ऑनलाइन परीक्षा देणारे विद्यार्थी - ५०४१७
ऑफलाइन परीक्षा देणारे विद्यार्थी - १३०००
नोंदणी न केलेले विद्यार्थी - १०,०००
एकूण विद्यार्थी संख्या - ७४०११



### त्यांची परीक्षा पुन्हा घेऊ

ज्या विद्यार्थ्यांना परीक्षेदरम्यान कोरोना संसर्ग होईल किंवा अन्य कारणाने परीक्षा देता येणार नाही. अशा विद्यार्थ्यांची परीक्षा पुन्हा घेण्यात येईल. विद्यार्थ्यांनी काळजी करू नये. आता होणाऱ्या परीक्षेमध्ये विद्यार्थी नापास होतील त्यांचीही परीक्षा लगेच घेऊन त्यांचे शैक्षणिक नुकसान टाळले जाईल, असेही मंत्री सामंत यांनी सांगितले.

परीक्षांबाबत मंत्री सामंत म्हणाले, ''मुंबई विद्यापीठाच्या ऑनलाइन परीक्षेदरम्यान पाच लाख लोकांनी एकाच वेळी परीक्षेचे पेज ओपन केले. त्यामुळे यंत्रणा कोलमडली. हा एक प्रकारचा सायबर हल्ला असून याची तक्रार पोलिसांकडे दिली आहे. वरिष्ठ अधिकारी याचा तपास करत आहेत. अशा प्रकारचा कोणताही हल्ला, गोंधळ अथवा तांत्रिक समस्या शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षेदरम्यान उद्भवू नये यासाठी सर्व ती काळजी घेतली जाणार असल्याचे विद्यापीठ प्रशासनाने सांगितले. विद्यापीठाची तयारी चांगली असून अंतिम टप्प्यात आली आहे. सराव परीक्षा घेण्याचाही त्यांचा मानस आहे. या सर्व परीक्षा निर्विघ्नपणे पार पडतील.''



शिवाजी विद्यापीठ कुलगुरूपदी निवड झाल्याबद्दल डॉ. डी. टी. शिर्के यांचा सत्कार आमदार राजू आवळे यांनी केला. यावेळी प्राचार्य युवराज गोंडे, प्रकाश पाटील, सचिन चव्हाण, उदय पाटील उपस्थित होते.

# कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे ईमेलवर शुभेच्छा देण्याचे आवाहन

कोल्हापूर, ता. ९ : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सर्वांनी ई-मेलवर शुभेच्छा द्याव्यात, असे आवाहन केले आहे. याबाबतचे निवेदन त्यांनी ई-मेलद्वारे प्रसिद्ध केले आहे. त्यात त्यांनी 'शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदी माझी निवड झाल्यानंतर दोन दिवसांत विद्यापीठ कार्यालयात शुभेच्छुकांची गर्दी होऊ लागली आहे. या साऱ्यांच्या भावना मी समजू शकतो. त्यांचे मी स्वागतच करतो. कोविड पार्श्वभूमीवर संसर्ग टाळण्याच्या दृष्टीने शुभेच्छुक मान्यवर व नागरिकांनी विद्यापीठ कार्यालयात गर्दी न करता कुलगुरू कार्यालयाच्या ई-मेलद्वारे (vcoffice@unishivaji.ac.in) अथवा टपालाद्वारे आपल्या शुभेच्छा द्याव्यात, असे आवाहन केले आहे.

# कुलगुरु शिर्के सरांच्या निवडीचा तालुक्याला अभिमान : आवळे

लोकमत न्यूज नेटवर्क

**खोची :** शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदी वाठार गावचे सुपुत्र डॉ. डी. टी. शिर्के यांच्या निवडीमुळे स्थानिक जनतेला अत्यानंद झाला आहे. ज्या संस्थेत शिकले, जेथे नोकरी केली त्या संस्थेच्या सर्वोच्च पदावर [illegible]

आहे. त्यांच्या कारकिर्दीत विद्यापीठाची सर्वच क्षेत्रांत गतिमान प्रगती होईल, असा विश्वास आमदार राजू आवळे यांनी व्यक्त केला. आमदार आवळे यांनी कुलगुरु डॉ. शिर्के यांचा सत्कार केला. यावेळी प्राचार्य प्रकाश पाटील, प्राचार्य युवराज गोंडे, वडगाव शहर काँग्रेसचे [illegible]

# कुलगुरूंचे शुभेच्छुक नागरिकांना आवाहन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदी माझी निवड झाल्यानंतर गेल्या दोन दिवसांत विद्यापीठाच्या कार्यालयात शुभेच्छुकांची गर्दी होऊ लागली आहे. या साऱ्यांच्या भावना मी समजू शकतो. त्यांचे मी स्वागतच करतो. तथापि, कोविडच्या सामूहिक संसर्ग टाळण्याच्या दृष्टीने शुभेच्छुक मान्यवर आणि नागरिकांनी विद्यापीठ कार्यालयात गर्दी करू नये. त्यांनी माझ्या कार्यालयाच्या ई-मेलद्वारे (vcoffice@unishivaji.ac.in) अथवा टपालाद्वारे आपल्या शुभेच्छा द्याव्यात, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले आहे.

# कुलगुरू शिर्के यांनी घेतला परीक्षा नियोजनाचा आढावा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** अंतिम सत्र, वर्षाच्या परीक्षा नियोजनाचा आढावा घेऊन शिवाजी विद्यापीठाचे नूतन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी कामाची सुरुवात केली. त्यांना विविध संघटना, मान्यवरांनी प्रत्यक्ष भेटून, दूरध्वनीवरून शुभेच्छा दिल्या. यापूर्वी त्यांनी कोल्हापुरातील महापुरुषांच्या पुतळ्यांना अभिवादन केले.

परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून त्यांनी अंतिम सत्र, वर्षाच्या परीक्षांच्या तयारीची माहिती घेतली. परीक्षाविषयक कामकाज सुनियोजित व्हावे, या दृष्टीने दक्षता घेण्याच्या सूचना त्यांनी परीक्षा मंडळाला दिल्या. दरम्यान, डॉ. शिर्के यांनी शहरातील बिंदू चौक येथील महापुरुषांच्या पुतळ्यांचे दर्शन घेऊन कुलगुरुपदाच्या कारकिर्दीतील पहिल्या दिवसाची सुरुवात केली. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्मृतिस्तंभ, छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, छत्रपती राजाराम महाराज, करवीर संस्थान संस्थापिका छत्रपती ताराराणी आणि लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या पुतळ्यांना पुष्प वाहून त्यांनी अभिवादन केले. शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे यांच्या स्मृतिस्थानास त्यांनी भेट दिली.